# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २०७/२०२३

विद्यापीठाच्या अहमदनगर व नाशिक उपकेंद्रासाठी विद्यापीठ निधीतून हंगामी स्वरुपात ठराविक कालावधीसाठी करार पध्दतीने खालील शिक्षकेतर पदे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यापीठ निधीतून कार्यरत असलेल्या तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व संस्था येथील कार्यरत असणाऱ्या व संबंधित पदांची शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबतचे निकष पूर्ण करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात **दिनांक २६ /०९/२०२३ ते दिनांक १०/ १०/२०२३** या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील भरावयाचा ऑनलाईन (Online) अर्ज विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदनाम व वेतन स्तर | पदाचा गट | पदाचा कालावधी | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | **सहायक कुलसचिव**<br><br>सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतन संरचना<br>वेतन स्तर (Level) : S-20 | अ | पाच वर्षे* | ०२ | १.कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. कक्षाधिकारी (सर्वसाधारण) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/- या वेतनश्रेणीतील अथवा सदर वेतनश्रेणीशी समकक्ष सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षांचा कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>विद्यापीठ / वरिष्ठ महाविद्यालयीन / कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील पूर्ण वेळ मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून अध्यापनाचा किमान रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.४४०० या वेतनश्रेणीतील अथवा सदर वेतनश्रेणीशी समकक्ष सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षांचा अनुभव. |

[ * सुरुवातीस नियुक्ती ही रुजू दिनांकापासून प्रथमतः एक वर्ष कालावधीसाठी हंगामी स्वरुपात करार पध्दतीची असेल. एक वर्षे कालावधीमधील कामकाजासंबंधी विभागप्रमुख यांचा अहवाल व शिफारस विचारात घेऊन पुढील एक वर्षे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल. सदर दोन वर्षांच्या कालावधीमधील कामकाजासंबंधी विभागप्रमुख यांचा अहवाल व शिफारस विचारात घेऊन पुढील उर्वरित तीन वर्षे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल.]

## सर्वसाधारण सूचना

- **ऑनलाईन अर्ज करण्याच्या महत्वाच्या तारखा :**

१. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी : **मंगळवार, दिनांक २६ /०९/२०२३** ते **मंगळवार, दिनांक १०/ १०/२०२३ पर्यंत.**

२. ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंटआऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र चिकटवून **शनिवार, दिनांक १४/१०/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७ येथे जमा करण्यात यावे.

३. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :**

१. उमेदवाराने विद्यापीठ संकेतस्थळावरील परिपत्रक काळजीपूर्वक वाचावे.

२. उमेदवाराने अर्ज (Hard Copy) विद्यापीठात सादर करतांना शैक्षणिक, अनुभव आणि अन्य प्रमाणपत्रे व अर्ज शुल्काच्या चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

३. ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना सर्वप्रथम संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी (Create Account) करावयाची आहे.

५. संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करतांना उमेदवाराने त्याची वैयक्तिक माहिती अचूकरित्या भरुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा.

६. Login मध्ये युजर नेम व पासवर्ड टाकल्यावर अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती अचूकरित्या दिलेल्या क्रमाने भरावी.

७. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या शीर्षकावर जाण्यापूर्वी अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यानंतर उमेदवारास वरील माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

८. अर्जाचे शुल्क खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२००/-इतके आहे. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या लिंकवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने त्यास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदासंदर्भातील माहिती भरल्यानंतर अर्जाच्या शुल्काचे तीन प्रतीत तयार झालेले चलन बँक ऑफ महाराष्ट्र (Bank of Maharashtra) अथवा एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) च्या कोणत्याही शाखेत रोख भरण्यात यावे. तसेच अर्जाचे शुल्क डेबीट / क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुध्दा भरता येतील. तद्नंतरच अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जाची प्रिंटआऊट काढावी.

९. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या पदाकरिता अर्ज (Apply) करता येणार नाही.

१०. वरील पदांसाठी फक्त विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- **अर्ज शुल्क :**

  १. खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त)

  २. मागासवर्गीय (सर्व प्रवर्गातील) व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामधील (ईडब्ल्युएस) उमेदवारांसाठी रु.२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त)

  ३. सदर अर्जाचे शुल्क हे ना परतावा राहील.

- **वयोमर्यादाः**

  सदर पदासाठी किमान ३० वर्षे आणि कमाल ५० वर्षे.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र :**

  १. शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

  २. प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **इतर सूचना, नियम व अटी :**

  १. परिपत्रकानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी झाल्यानंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेवून प्रतिनियुक्तीसाठी निवड करण्यात येईल.

  २. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

  ३. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतन, अंशदानात्मक विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

  ४. अर्जदार सेवेत असलेल्या ठिकाणी मागील १० वर्षामध्ये जबर शिक्षा (Major Penalty) अथवा मागील ५ वर्षांमध्ये किरकोळ शिक्षा (Minor Penalty) झालेली नसावी. याबाबतचे नियुक्ती प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

  ५. अर्जदार सेवेत असलेल्या ठिकाणचे मागील ३ वर्षांचे गोपनीय अहवाल समाधानकारक असावेत. अर्जासोबत गोपनिय अहवालांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे .

६. अर्जदाराची संबंधित पदावर प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास संबंधित पदाच्या वेतनश्रेणीमधील मूळ वेतनावर प्रतिनियुक्ती करण्यात येईल. तसेच शासनमान्य इतर भत्ते देय राहतील. अर्जदाराचे मूळ आस्थापनेतील मूळ वेतन संरक्षित केले जाणार नाही.

७. अर्जदाराची संबंधित पदावर प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास अर्जदारास प्रतिनियुक्तीच्या कालावधीकरीता धारणाधिकार देणार व प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यास अथवा संपुष्टात आणल्यास उमेदवारास मूळ आस्थापनेत व मूळ पदावर रुजू करुन घेण्याबाबतचे संमतीपत्र / हमीपत्र नियोक्त्याकडून घेऊन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)

८. शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी या भरती प्रक्रियेला लागू राहतील.

९. पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

१०. अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

११. या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी. यासंबंधी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

१२. अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण या बाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑनलाईन (Online) भरावा.

१३. ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जातवैधता प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.) महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

१४. सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयप्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५. माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) यांच्या शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ आणि दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन पुरकपत्रानुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

१६. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१७. मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास अथवा संकेतस्थळावरील भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द केलेल्या सूचना व माहितीची उमेदवाराने नोंद न घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

१८. पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासन हे स्वतःकडे ठेवत आहे. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१९. अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२०. जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

२१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय : क्र. बी.सी.सी. १०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ मधील मूद्दा क्र. २(६) नुसार प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदू नामावली वापरता येत नाही.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/3103
दिनांक : 26 SEP 2023

**- संमतीपत्र / हमीपत्र -**

श्री/श्रीमती ------------------------------------------------------------ हे -------------------- या पदावर दिनांक ----------- पासून सेवेत असून त्यांना दिनांक ----------------- पासून सेवेत कायम करण्यात आलेले आहे. सध्या ते ---------------------------------- या पदावर दिनांक ----------------- पासून कार्यरत आहेत. सातव्या वेतन आयोगानुसार त्यांना --------------------------------------------------- या वेतनश्रेणीमध्ये वेतन देण्यात येत आहे.

श्री/श्रीमती------------------------------------------------ यांची विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.----/२०२३, जावक क्र.एएन-------, दिनांक ---------------- नुसार संबंधित पदावर प्रतिनियुक्तीकरिता निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीकरिता संबंधित पदावर रुजू होण्याकरिता कार्यमुक्त करण्यात येईल. तसेच प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यास अथवा संपुष्टात आणल्यास त्यांना या आस्थापनेतील त्यांच्या मुळ पदावर रुजू करुन घेण्यात येईल.

सही/शिक्का